# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 30/01/2023 (सोमवार) दुपार

---

## चोरी

**१) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत लापका शेत शिवार मौदा येथे दिनांक २८/०१/२०२३ चे १९.३० वा. ते २९/०१/२०२३ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— लंकेश्वर हटवार, वय ३० वर्ष, रा. मौदा ता. मौदा यांची मधुबन हॉटेल च्या विरूदध दिशेला साडेसात एकर शेती असुन त्या शेतीमध्ये विहीर असुन त्या विहीरीमध्ये दीड वर्षापासुन ईशा कंपनीची ३ एच. पी. ची पानबुडी मोटार असुन शेताला पाणी देण्याकरीता लावली होती. नमुद घटनावेळी व ठिकाणी फिर्यादी हा शेताला पाणी देवुन घरी परत आला नंतर बघितले असता मोटार दिसुन आली नाही. कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीची ईशा कंपनीची ३ एच. पी. ची पानबुडी मोटार किंमती अंदाजे ५०००/— रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक राजु आंधळे ब. नं ७२१ मो. नं. ८२०८८७४६६५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. बुट्टीबोरी** :— अंतर्गत मौजा बुट्टीबोरी बस स्टॉप बुट्टीबोरी येथे दिनांक २७/०१/२०२३ चे १०.३० वा. ते ११.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— पदमाकर बाबुराव भगत, वय ७२ वर्ष, रा. लेक टावुन को ऑपरेटीव्ह हाउसिंग सोसायटी प्लॉट नं ८०४ बिववक वाडी पुणे हे नागपुर ते हिंगणघाट एसटी बसने पत्नी सह प्रवास करित असता बस मधील प्रवाशांची गर्दी असल्याने व बसमधील लगज ठेवण्याची कॅरी तुटल्याने त्यांनी त्यांचे ०२ सुटकेस ड्रायव्हर सिटच्या मागिल पहिल्या सिट जवळील मोकळया जागेत ठेवले व ०१ बॅग स्वत: जवळ ठेवुन कंडक्टर साईडला तिसऱ्या रांगेत बसले दिनांक २८/०१/२०२३ रोजी वर्धा येथिल नातेवाईकांकडे पोहचल्यावर सुटकेसची पाहणी केली असता प्रवासादरम्यान त्यांचे सुटकेस मध्ये असलेले १) i phone 14 pro 128 gb deep puple किंमती अंदाजे ८०,०००/— रू 2) ipad 10 th generation wi fi 256 gb upv no 194253389606 serial no DNFWWMK93J किंमती अंदाजे ५०,०००/—रू. 3) ipad 9 th generation wi fi 64 gb upc no. 194252515655 serial no h249g7ht73 किंमती अंदाजे २०,०००/— असा एकुण १,५०,००० रूपयाचा मुद्देमाल नागपुर ते बुट्टीबोरी दरम्यान एसटी बसने प्रवास करित असताना बस मधील संशयीत आरोपी ३५ ते ४० वयोगटातील ०३ अनोळखी प्रवाशांनी सदरचा मुदेदमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बुट्टीबोरी येथे अज्ञात आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक नरेश गाते ब. नं ९४३ मो.नं. ९९२३०२७२१४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**